International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन साधनसंपत्ती विकासाचे विश्लेषण : विशेष संदर्भ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (१९७५ ते २०११)

**डॉ. शिवाजी दत्तात्रय रायजादे**

*सहाय्यक प्राध्यापक*

*श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर*

*Corresponding Author – डॉ. शिवाजी दत्तात्रय रायजादे*

**DOI - 10.5281/zenodo.18491378**

पर्यटन हा आधुनिक काळातील झपाट्याने विकसित होणारा जागतिक आर्थिक व्यवसाय आहे. जगातील विकसित तसेच विकसनशील देशांमध्ये पर्यटन क्षेत्राचा वेगाने विकास होत असून अनेक देशांची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे. वाढती व्यक्तीगत उत्पन्नक्षमता, कामाचे तास कमी होणे, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर तसेच जलद व तुलनेने स्वस्त प्रवास साधनांची उपलब्धता या सर्व घटकांच्या एकत्रित परिणामामुळे प्रवास व पर्यटन उद्योगाला चालना मिळाली आहे. पर्यटनाच्या आर्थिक महत्त्वाची जाणीव झाल्यामुळे प्रत्येक देश पर्यटन साधनसंपत्ती व मूलभूत सोयी-सुविधांचा विकास करण्यावर भर देत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यास प्राचीन काळापासून पर्यटनदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. सातवाहन काळात कोल्हापूरच्या नागरीकरणास सुरुवात झाली असून रोमन साम्राज्याशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाल्याचे उल्लेख आढळतात. चालुक्य, राष्ट्रकूट व शिलाहार काळात महालक्ष्मी मंदिराच्या विकासामुळे कोल्हापूरला धार्मिक महत्त्व प्राप्त झाले. शिलाहार काळात पन्हाळा हे राजधानीचे ठिकाण ठरल्याने कोल्हापूरचे राजकीय महत्त्व वाढीस लागले. महाराणी ताराबाई यांनी कोल्हापूर राज्याची निर्मिती केल्यामुळे त्यास स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासाला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. सांस्कृतिक, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडून आले. संगीत, नाट्य, चित्रकला, मर्दानी खेळ, क्रीडा आदी क्षेत्रांत कोल्हापूरचे स्वतंत्र सांस्कृतिक वैशिष्ट्य निर्माण झाले. या सर्व ऐतिहासिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक पार्श्वभूमीमुळे कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणून ओळखला जातो.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) हे राज्यातील पर्यटन विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांवर सुविधा व साधनसंपत्तीच्या विकासासाठी महामंडळाने राबविलेले उपक्रम, योजना व पायाभूत सुविधांचा विकास यांचा अभ्यास करणे हे सदर संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ :

महाराष्ट्र राज्यास पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत वैभवशाली असा वारसा लाभलेला आहे. प्रदीर्घ ऐतिहासिक परंपरा, समृद्ध सांस्कृतिक वारसा, धार्मिक परंपरा तसेच

विविध नैसर्गिक व भौगोलिक सौंदर्यस्थळे यांमुळे महाराष्ट्राने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटन क्षेत्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. अजंठा, वेरूळ व एलिफंटा यांसारखी जागतिक वारसा स्थळे, ऐतिहासिक किल्ले, विस्तीर्ण समुद्रकिनारे, वन्यजीव अभयारण्ये तसेच विविध धार्मिक तीर्थस्थाने यांमुळे महाराष्ट्र हे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण केंद्र ठरले आहे. याशिवाय राज्यातील लोककला, सण-उत्सव, परंपरा, सांस्कृतिक विविधता आणि वैशिष्ट्यपूर्ण खाद्यसंस्कृती यांमुळे पर्यटनास अधिक चालना मिळाली आहे.

महाराष्ट्रातील पर्यटनाच्या वाढत्या महत्त्वाची दखल घेऊन पर्यटन व्यवसायाला संघटित व नियोजनबद्ध स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने इ.स. १९६९ मध्ये पर्यटन संचालनालयाची स्थापना केली.[१] या स्थापनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेली पर्यटन स्थळांवरील विश्रामगृहे, बंगले व इतर सुविधा पर्यटन संचालनालयाकडे हस्तांतरित करण्यात आल्या. तथापि, शासकीय यंत्रणेद्वारे पर्यटनाचा अपेक्षित वेगाने विकास साध्य होणार नाही, अशी जाणीव झाल्याने महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र व स्वायत्त महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने २० जानेवारी १९७५ रोजी कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत 'महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळा'ची (Maharashtra Tourism Development Corporation – MTDC) स्थापना करण्यात आली. राज्यातील पर्यटन साधनसंपत्तीचा शोध, विकास, व्यवस्थापन व प्रचार-प्रसार करणे हे महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले. या उद्देशपूर्तीसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत नवी दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, अमरावती व औरंगाबाद येथे विभागीय कार्यालयांची स्थापना करण्यात आली. या कार्यालयांद्वारे पर्यटन स्थळांचा विकास, पर्यटकांना मार्गदर्शन, माहिती पुरवठा तसेच विविध पर्यटनविषयक योजना व उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते.[२]

कोल्हापूर येथे इ.स. १९७५ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालयाची स्थापना झाल्यानंतर जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी विविध योजना व उपक्रम राबविण्यात आले. ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक व नैसर्गिक पर्यटन स्थळांच्या विकासासाठी पायाभूत सुविधा, निवास व्यवस्था, माहिती केंद्रे तसेच पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सोयी-सुविधांचा विस्तार करण्यावर विशेष भर देण्यात आला.

**हॉलिडे होम्स:**

इ.स. १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थान मुंबई राज्यामध्ये विलीन झाल्यानंतर शासनामार्फत कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन विकासाला नियोजनबद्ध स्वरूपात चालना देण्यात आली. प्रारंभी पन्हाळा किल्ल्याचे पर्यटनदृष्ट्या असलेले महत्त्व लक्षात घेऊन त्या ठिकाणी विविध विकास योजना राबविण्यात आल्या. संस्थान काळापासूनच पन्हाळा हे थंड हवेचे तसेच ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित झालेले होते. पन्हाळा येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी निवास व भोजनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई राज्य प्रशासनामार्फत पन्हाळा नगरपरिषदेजवळ चौदा खोल्यांचे 'हॉलिडे होम्स' उभारण्यात आले. या हॉलिडे होम्सचे उद्घाटन १४ डिसेंबर १९५८ रोजी तत्कालीन मुंबई राज्याचे राज्यपाल मा. प्रकाश यांच्या हस्ते करण्यात आले.[३] या निवासगृहांचे सहा गट करण्यात आले असून त्यांना 'ए', 'बी', 'सी', 'डी', 'ई' आणि 'एफ' अशी नावे देण्यात आली. इ.स. १९७५ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापना झाल्यानंतर पन्हाळा येथील ही 'हॉलिडे होम्स' व्यवस्था महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आली. या हॉलिडे होम्सच्या माध्यमातून पन्हाळा येथे येणाऱ्या पर्यटकांना निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध करून

देण्यात येते. यासोबतच पर्यटकांसाठी मार्गदर्शक सेवा तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांची माहिती पुरविण्याचे कार्यही या केंद्रांमार्फत केले जाते.[४]

**निवास आणि न्याहरी योजना:**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने राज्यातील विविध पर्यटन स्थळांवर पर्यटन संकुलांची उभारणी केली आहे. तथापि, पर्यटन विकासाच्या दृष्टीने निश्चित करण्यात आलेल्या सर्व ठिकाणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने स्वतः किंवा खाजगी संस्थांच्या माध्यमातून पर्यटकांसाठी कायमस्वरूपी निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे हे आर्थिक तसेच प्रशासकीय दृष्ट्या नेहमीच शक्य होत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे अनेक पर्यटन स्थळांवर पर्यटकांचा ओघ हा विशिष्ट पर्यटन हंगामापुरताच किंवा वर्षातील काही ठराविक महिन्यांपुरताच मर्यादित असतो. परिणामी, अशा ठिकाणी उभारण्यात आलेल्या पर्यटन संकुलांवरील गुंतवणूक व त्यांची देखभाल करण्याचा खर्च विचारात घेता ती व्यापारीदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही.

त्याचप्रमाणे, दुर्गम पर्यटन स्थळांना भेट देऊ इच्छिणाऱ्या पर्यटकांसाठी अनेक ठिकाणी निवासाची सुविधा उपलब्ध नसते किंवा ती अत्यल्प स्वरूपाची असते. परिणामी पर्यटकांना अपुऱ्या सोयी-सुविधांचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने अशा पर्यटन स्थळांचा सखोल अभ्यास केला असता असे आढळून आले की, अनेक ठिकाणी असलेली घरे व बंगले वर्षभर पूर्णपणे किंवा कायमस्वरूपी घरमालकांकडून वापरात नसतात.

या उपलब्ध निवाससाधनांचा पर्यटनासाठी उपयोग करून घेण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत २७ मे १९९८ रोजी ‘निवास आणि न्याहरी’ (Bed and Breakfast) ही योजना अंमलात आणण्यात आली. या योजनेअंतर्गत ज्या पर्यटन स्थळांवर पर्यटकांचा ओघ मर्यादित कालावधीपुरताच असतो, अशा ठिकाणी स्थानिक नागरिकांच्या सहभागातून पर्यटकांसाठी निवास व न्याहरीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.[५] या योजनेची अंमलबजावणी कोल्हापूर जिल्ह्यातही करण्यात आली असून पन्हाळा परिसरात ७ संकुले, कोल्हापूर शहरात ६ संकुले तसेच आंबा येथे २ संकुले विकसित करण्यात आली आहेत. ‘निवास आणि न्याहरी’ योजनेमुळे पर्यटकांना घरगुती स्वरूपातील निवास सुविधा उपलब्ध झाल्या असून त्यांना स्थानिक जीवनपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव घेता येऊ लागला आहे. याचबरोबर स्थानिक नागरिकांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.[६] विशेषतः राज्याबाहेरील व परदेशी पर्यटकांना घरमालकांसोबत वास्तव्यास राहून स्थानिक संस्कृती, राहणीमान, चालीरीती तसेच पारंपरिक खाद्यसंस्कृती यांची सखोल ओळख निर्माण होण्यास या योजनेमुळे मदत झाली आहे.

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ वाहतूक शाखा:**

पर्यटकांना वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत इ.स. १९७६ मध्ये स्वतंत्र वाहतूक शाखा सुरू करण्यात आली. या शाखेच्या माध्यमातून राज्यातील विविध पर्यटन स्थळांवर नियोजनबद्ध सहली आयोजित करण्यात येत होत्या. या सहलींच्या योजनेत कोल्हापूर जिल्ह्याचाही समावेश करण्यात आला होता. कोल्हापूर येथे ‘करवीर दर्शन’ या नावाने विशेष पर्यटन बससेवा सुरू करण्यात आली. या सहलीच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यातील जोतिबा, पन्हाळा, नवीन राजवाडा, मांडरे कला संग्रहालय, महालक्ष्मी मंदिर, भवानी मंडप तसेच रंकाळा तलाव यांसारख्या प्रमुख पर्यटन व प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या जात होत्या. या सहलीचा कालावधी सुमारे १० तासांचा होता. याशिवाय प्रत्येक रविवारी विशेष सहलींचे आयोजन करण्यात येत असून त्यामध्ये दाजीपूर अभयारण्य, काळम्मावाडी धरण, फोंडा घाट, कोकण दर्शन तसेच

राधानगरी जलाशय या पर्यटन स्थळांचा समावेश होता. तसेच महामंडळामार्फत 'दत्तदर्शन' या नावाने प्रत्येक गुरुवारी स्वतंत्र बससेवा सुरू करण्यात आली होती. या सेवेअंतर्गत बाहुबली, रामलिंग मंदिर, औदुंबर, नृसिंहवाडी तसेच सांगली येथील महागणपती मंदिर अशा धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना पर्यटकांना भेटीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत होती. या सहलीदरम्यान महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत पर्यटकांसाठी अल्पोपहार व भोजनाची व्यवस्थाही करण्यात येत होती. अशा प्रकारे वाहतूक शाखेच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी पर्यटकांना सुलभ, सुरक्षित व नियोजनबद्ध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.[७]

तथापि, इ.स. १९९२ च्या सुमारास महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामध्ये नियोजनाच्या अभावामुळे वाहतूक शाखा बंद करण्यात आली.[८] या निर्णयाचा कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटनावर प्रतिकूल परिणाम झाला, विशेषतः स्थानिक तसेच बाहेरील पर्यटकांच्या संख्येत घट झाल्याचे आढळून येते.

**दि डेक्कन ओडिसी:**

महाराष्ट्राला भारतातील प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहाय्याने विविध पर्यटनविषयक योजना आखल्या आहेत. या योजनांपैकी 'डेक्कन ओडिसी' ही शाही पर्यटन रेल्वे योजना विशेष महत्त्वाची ठरते. राजस्थान राज्यातील 'पॅलेस ऑन व्हील्स' (पूर्वी 'रॉयल राजस्थान ऑन व्हील्स') या शाही रेल्वेच्या धर्तीवर महाराष्ट्रातही अशाच प्रकारची पर्यटन रेल्वे सुरू करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील होते. या प्रयत्नांना यश येऊन इ.स. २००१ मध्ये महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व भारत सरकारचे रेल्वे मंत्रालय यांच्यात सामंजस्य कराराचा मसुदा निश्चित करण्यात आला. या सामंजस्य करारावर दि. ७ फेब्रुवारी २००१ रोजी नवी दिल्ली येथील रेल्वे भवन येथे रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांच्या अधिकृत प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या. या शाही पर्यटन रेल्वेस 'डेक्कन ओडिसी' असे नामकरण करण्यात आले. 'डेक्कन ओडिसी' प्रकल्पासाठी सुरुवातीला अंदाजित भांडवली खर्च रुपये ३२.८८ कोटी इतका निश्चित करण्यात आला होता. या प्रकल्पामध्ये रेल्वे मंत्रालयाचा सहभाग रेल्वे डबे, इंजिन, लोहमार्गाचा वापर तसेच गाडी चालविण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग या स्वरूपात असून त्याची अंदाजित किंमत रुपये १४ कोटी इतकी होती. याशिवाय भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाचा आर्थिक सहभाग रुपये ८.४९ कोटी तर महाराष्ट्र शासनाचा सहभाग रुपये १०.३९ कोटी इतका निश्चित करण्यात आला होता.[८]

'डेक्कन ओडिसी' या शाही पर्यटन रेल्वेची अधिकृत सुरुवात इ.स. २००३ मध्ये करण्यात आली. या शाही रेल्वेमार्फत पर्यटकांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तिचे व्यवस्थापन 'ताज ग्रुप ऑफ हॉटेल्स'कडे सोपविण्यात आले आहे.[९] या गाडीमध्ये एकूण २१ डबे असून त्यापैकी १३ डबे प्रवासी कार स्वरूपाचे आहेत. 'डेक्कन ओडिसी'मध्ये एकावेळी एकूण ९६ प्रवाशांच्या प्रवासाची व निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. या रेल्वेमधील ११ प्रवासी कारमध्ये पंचतारांकित दर्जाची वातानुकूलित शयनगृहे असून प्रत्येक शयनगृहात दोन व्यक्तींच्या निवासाची सोय आहे. प्रत्येक प्रवासी डब्यामध्ये सहा पर्यटक राहू शकतात. उर्वरित डब्यांमध्ये दोन उपहारगृहे, एक बार, एक परिषद कक्ष (कॉन्फरन्स रूम), आरोग्य सुविधा केंद्र (हेल्थ कार), दोन जनरेटर कार, कर्मचारी निवास व्यवस्था तसेच भांडारगृह यांचा समावेश आहे. या शाही रेल्वेमध्ये पर्यटकांसाठी म्युझिक चॅनेल्स, इंटरकॉम सुविधा, सी.डी. व एम.पी.३ प्लेअर, इंटरनेट सुविधा, परकीय चलन विनिमय तसेच क्रेडिट कार्ड वापरण्याची सोय यांसारख्या आंतरराष्ट्रीय

दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. 'डेक्कन ओडिसी'च्या प्रवासी डब्यांना महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ले व प्रसिद्ध स्थळांची नावे देण्यात आली होती. त्यामध्ये अंजनेरी, रत्नागिरी, रायगड, सिंहगड, सिंधुदुर्ग, माहिम, नळदुर्ग, गाविलगड, दौलताबाद, विजयदुर्ग व आंबागड यांचा समावेश होता. याशिवाय जागतिक वारसा स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या अजंठा व वेरूळ या लेण्यांची नावे दोन विशेष डब्यांना देण्यात आली आहेत.

'डेक्कन ओडिसी' गाडीतील उपहारगृहांना 'पेशवा–१' व 'पेशवा–२' अशी नावे देण्यात आली होती. तर बारचे नाव 'मुंबई हाय', परिषद कक्षाचे नाव 'संवाद' तसेच स्पा कारचे नाव 'स्पा प्यूमेरिया' असे ठेवण्यात आले होते. 'डेक्कन ओडिसी'च्या प्रचार व आरक्षण व्यवस्थेसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने जगभरात एकूण १३ आरक्षण अभिकर्त्यांची नियुक्ती केली होती. या संदर्भात करण्यात आलेल्या करारानुसार प्रत्येक आरक्षण अभिकर्त्याकडून १०,००० अमेरिकन डॉलर्स इतकी रक्कम तसेच प्रतिवर्षी किमान १०० पर्यटकांच्या आरक्षणाची हमी महामंडळाने निश्चित करून घेतली होती. १० 'डेक्कन ओडिसी'च्या सुरुवातीच्या सहल कार्यक्रमामध्ये कोल्हापूर जिल्ह्याचा समावेश करण्यात आलेला नव्हता. तथापि, लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिकांच्या आग्रहाची दखल घेऊन रेल्वे बोर्ड व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने या शाही रेल्वेच्या सहल कार्यक्रमात कोल्हापूरचा समावेश करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार २० नोव्हेंबर २००५ पासून 'डेक्कन ओडिसी'चे कोल्हापूर येथे आगमन सुरू झाले.[११]

मुंबईहून निघणाऱ्या सात दिवसांच्या सहल कार्यक्रमामध्ये पर्यटकांना सुरुवातीला रत्नागिरी येथील निसर्गरम्य खाड्यांमधील नौकाविहाराचा अनुभव दिला जातो. त्यासोबतच स्थानिक खाद्यसंस्कृती व पारंपरिक जीवनशैलीची ओळख सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून करून दिली जात होती. पुढील दिवशी पर्यटकांना ऐतिहासिक सिंधुदुर्ग किल्ला, तारकली समुद्रकिनारा तसेच तारकली जेटी ते चिवला (चालाबल) जेटीपर्यंत जलसफरीचा अनुभव देण्यात येतो. यानंतर सावंतवाडी शहराला भेट देण्यात येते. त्यानंतर या शाही रेल्वेने गोव्याला भेट दिल्यानंतर ती कोल्हापूरकडे मार्गस्थ होते. कोल्हापूरच्या सहल कार्यक्रमामध्ये प्राचीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या महालक्ष्मी मंदिरासोबतच शालिनी पॅलेस व न्यू पॅलेस या प्रमुख पर्यटन स्थळांचा समावेश करण्यात आला होता. यासोबतच मर्दानी खेळ, कुस्ती, तसेच स्थानिक कारागिरांनी निर्मित केलेल्या हस्तकलेच्या वस्तूंमधून कोल्हापूरच्या समृद्ध सांस्कृतिक वैभवाचे दर्शन पर्यटकांना घडविण्यात होते.

कोल्हापूर येथील पर्यटन स्थळांना भेट दिल्यानंतर 'डेक्कन ओडिसी' पुण्याकडे प्रस्थान करते. पुण्याहून पुढे औरंगाबादकडे प्रवास करून औरंगाबाद मुक्कामी जागतिक वारसा स्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वेरूळ (एलोरा) लेण्यांना भेट दिली जात होती. त्यानंतर जळगाव मार्गे अजंठा लेण्यांना पर्यटक भेट देतात. शेवटी नाशिक येथे नाशिक घाट व मंदिर परिसराला भेट देऊन 'डेक्कन ओडिसी' मुंबईकडे परतीचा प्रवास करत होती. अशा प्रकारे 'डेक्कन ओडिसी' या शाही पर्यटन रेल्वेच्या सहलीचे नियोजन करण्यात आले असून, त्यातून महाराष्ट्रातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक व धार्मिक पर्यटन स्थळांचे एकात्मिक दर्शन पर्यटकांना घडविले जात होते. [१२]

'डेक्कन ओडिसी' या शाही पर्यटन रेल्वेच्या माध्यमातून महाराष्ट्रासह कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन विकासाला शासनामार्फत महत्त्वपूर्ण चालना देण्यात आली आहे. या रेल्वेमार्फत इ.स. २००४ ते २०११ या कालावधीतील पर्यटक संख्येची उपलब्ध आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे:

| वर्ष | पर्यटक संख्या |
|---|---|
| २००४-०५ | ४०६ |
| २००५-०६ | ६१२ |
| २००६-०७ | ७१५ |
| २००७-०८ | १०६७ |
| २००८-०९ | ६४९ |
| २००९-१० | १०१४ |
| २०१०-११ | १३४६ |

(संदर्भ : डेक्कन ओडीसी प्रवासी नोंद पुस्तिका)

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, २००८–०९ हे वर्ष वगळता उर्वरित कालावधीत 'डेक्कन ओडिसी'द्वारे प्रवास करणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत सातत्याने वाढ झालेली आहे. २००८–०९ या वर्षातील पर्यटक संख्येत झालेली घट ही २६ डिसेंबर २००८ रोजी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय पर्यटनावर पडलेल्या प्रतिकूल परिणामामुळे झाल्याचे स्पष्ट होते. तथापि, २००९–१० पासून पुन्हा पर्यटक संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून येते.

'डेक्कन ओडिसी'च्या माध्यमातून अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, स्वित्झर्लंड, इटली, सिंगापूर, रशिया आणि जपान या देशांतील पर्यटकांनी कोल्हापूर जिल्ह्याला भेट दिली आहे. यामुळे कोल्हापूरच्या पर्यटनास आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली असून स्थानिक पर्यटन अर्थव्यवस्थेलाही चालना मिळाली आहे. विशेषतः स्थानिक कारागीर, कलाकार व हस्तव्यवसायिकांना पर्यटनाच्या माध्यमातून उत्पन्नाचे नवे स्रोत उपलब्ध झाले आहेत. या शाही रेल्वेच्या पर्यटन प्रवासातील कोल्हापूरच्या महत्त्वाची दखल पर्यटकांच्या अभिप्रायातूनही स्पष्टपणे दिसून येते. २० नोव्हेंबर २००५ रोजी 'डेक्कन ओडिसी'द्वारे कोल्हापूरला भेट देणाऱ्या अमेरिकेतील पर्यटक जॉन मेरी यांनी आपल्या अभिप्रायात नमूद केले की, "कोल्हापूरच्या लोकांनी केलेल्या आदरातिथ्यामुळे आम्ही पूर्णपणे भारावून गेलो आहोत. कोल्हापूरमध्ये इतकी उत्तम खातरदारी अनुभवायला मिळेल, अशी कल्पनाही केली नव्हती. येथील न्यू पॅलेस वस्तुसंग्रहालय आणि कलात्मक शिल्पकलेने नटलेले महालक्ष्मी मंदिर आम्हाला विशेष भावले. भविष्यात पुन्हा कोल्हापूरला भेट देण्याचा मी नक्की प्रयत्न करीन." [१३] या अभिप्रायावरून 'डेक्कन ओडिसी'च्या सहल कार्यक्रमात कोल्हापूरचा समावेश केल्यामुळे पर्यटन विकासाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व अधोरेखित होते.

**कोल्हापूर दसरा महोत्सव ट्रस्ट:**

म्हैसूरच्या दसऱ्यानंतर महाराष्ट्रात कोल्हापूरचा 'दसरा' उत्सव विशेष प्रसिद्ध आहे. या उत्सवाच्या पारंपरिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे राज्यासह परराज्यातूनही मोठ्या प्रमाणावर पर्यटक कोल्हापूर शहरात दाखल होतात. या उत्सवाचे महत्त्व अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने शासनामार्फत विशेष समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या माध्यमातून 'कोल्हापूर दसरा महोत्सव ट्रस्ट'ची नोंदणी दि. १० ऑक्टोबर २००७ रोजी करण्यात आली. कोल्हापूर दसरा महोत्सव ट्रस्टच्या व्यवस्थापनासाठी विविध शासकीय व प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीच्या माध्यमातून कोल्हापूरच्या पर्यटन विकासासाठी तसेच शहराचे नाव राष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले. ट्रस्टमार्फत सन २००७-०८, २००८-०९, २००९-१० आणि २०१०-११ या कालावधीत दसरा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत मैफिली, प्रदर्शन, तसेच कोल्हापूरच्या वैशिष्ट्यपूर्ण खाद्यसंस्कृतीचे सादरीकरण करण्यात आले.

दसरा महोत्सवास अधिक व्यापक स्वरूप देण्याच्या दृष्टीने ट्रस्टमार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. तथापि, कोल्हापूर जिल्ह्यात दसरा सण घरोघरी

मोठ्या उत्साहात साजरा होत असल्याने तसेच त्या कालावधीत पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे पर्यटकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने अधिक अनुकूल कालावधीत महोत्सव आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.याच पार्श्वभूमीवर सन २०११ मध्ये 'कोल्हापूर दसरा महोत्सव ट्रस्ट'चे नाव बदलून 'कोल्हापूर महोत्सव ट्रस्ट' असे करण्यात आले आणि हा महोत्सव जानेवारी–फेब्रुवारी महिन्यात आयोजित करण्यास सुरुवात करण्यात आली. 'कोल्हापूर महोत्सव'च्या माध्यमातून जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देणे, स्थानिक कला-संस्कृतीला व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच आर्थिक व सामाजिक विकास साधणे, हा शासनाचा प्रमुख उद्देश असल्याचे दिसून येते.[१४]

एकंदरीत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने कोल्हापूर जिल्ह्यात पर्यटन सुविधा व साधनसंपत्ती विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. डेक्कन ओडिसी सारख्या शाही रेल्वे प्रकल्पामुळे कोल्हापूरचा समावेश आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर झाला आहे. यामुळे जिल्ह्यातील ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक स्थळांचा जागतिक स्तरावर प्रचार झाला. पर्यटन वाढीसाठी निवास, वाहतूक, मार्गदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम यांसारख्या सुविधांचा विकास करण्यात आला आहे. कोल्हापूर महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या परंपरा, कला व खाद्यसंस्कृतीला चालना देण्यात आली आहे. स्थानिक कारागीर, कलाकार व व्यावसायिकांना पर्यटनामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. पर्यटक संख्येत सातत्याने झालेली वाढ महामंडळाच्या प्रयत्नांची फलश्रुती आहे. शासकीय यंत्रणा व स्थानिक सहभाग यांच्या समन्वयातून पर्यटनाचा शाश्वत विकास साधला गेला आहे. त्यामुळे कोल्हापूर जिल्हा एक महत्त्वपूर्ण पर्यटन केंद्र म्हणून उदयास आला आहे.

**संदर्भ:**


१. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २००१, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, २००१, पृ.१८१
२. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र पर्यटन प्रगती अहवाल
३. पन्हाळा हॉलिडे उद्धाटन कोनशिला
४. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, कोल्हापूर कार्यालनीय माहिती.
५. शासन निर्णय क्र. व्ही.पी.एम. १०९७/ प्र.क्र. ४०१/२२ मंत्रालय दि. २७ मे १९९८ ग्राम विकास व जलसंधारण विभाग
६. Maharashtra Tourism Development Corporation District wise Beneficiaries Listed Under Bed & Breakfast Scheme list as on 1April, 2011.
७. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, कोल्हापूर कार्यालयीन माहिती.
८. दै. पुढारी, कोल्हापूर आवृत्ती, १८ नोव्हेंबर २००५
९. सत्पाळकर, वर्षा (संपा.) मस्त भटकंती, ऑक्टोबर २००८, पृ. १४
१०. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र पर्यटन प्रगती अहवाल
११. दै. पुढारी, आपलं कोल्हापूर, कोल्हापूर आवृत्ती, २१ नोव्हेंबर २००५, पृ. १
१२. Deshpande, Aruna, Odyssey in Maharashtra & Goa, Mumbai, 2007, p.12
१३. दै. पुढारी, आपलं कोल्हापूर, कोल्हापूर आवृत्ती, २१ नोव्हेंबर २००५, पृ. २
१४. जिल्हा नियोजन विभाग, कोल्हापूर कार्यालयीन टिप्पणी